रू.३,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्याचे प्रशासकीय विभागास असलेले अधिकार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- वैखप्र-२०१७/प्र.क्र.०३/म-१
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २६ जून, २०१९

संदर्भ :- सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.वैखप्र-२०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२, दि.१६.०३.२०१६

प्रस्तावना :-

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून, आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारावर खाजगी रूग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयात घेतलेल्या उपाचारांवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रू.३,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे अधिकार संदर्भाय शासन निर्णयान्वये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आले आहेत. वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रक्रियेत गतीमानता येण्यासाठी यासंदर्भात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागांतर्गत असलेल्या क्षेत्रिय कार्यालयांसाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोदंणी) यांना असलेल्या वरील अधिकारांचे प्रत्यायोजन नोदंणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून, आकस्मिक उद्भवणाऱ्या २७ आजारावर खाजगी रूग्णालयात घेतलेल्या उपचारांवरील तसेच ५ गंभीर आजारांवर शासनाने संपूर्ण खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयात घेतलेल्या उपाचारांवरील वैद्यकीय खर्चाच्या प्रत्येक प्रकरणी रू.३,००,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मंजूरी देण्याचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांना नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागांतर्गत असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासंदर्भात असलेले अधिकार, याबाबतीत सर्व प्रचलित शासन निर्णयांचे काटेकोर पालन करण्याच्या अटीवर नोदंणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रत्यायोजित करण्यात येत आहेत.

२. वरील अधिकारांच्या प्रत्यायोजनानंतरही नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोदंणी) हे “मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुख” म्हणून पुनर्विलोकन करून फेर आदेश किंवा सुधारित आदेश देण्याबाबतचे व अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार अबाधित राहतील.

३. या आदेशान्वये करण्यात आलेले अधिकाराचे प्रत्यायोजन हे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य या पदावर राज्य शासनाच्या सचिव दर्जाचा अधिकारी कार्यरत असल्यासच लागू राहील.

४. सदर शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अनौ. संदर्भ क्र.३४, दि.३१.०१.२०१९ व वित्त विभाग यांचे अनौ. संदर्भ क्र. २७/सेवा-५ दिनांक १६.०४.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२६१५४८०७६०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shyamsundar
Liladhar Patil

Digitally signed by Shyamsundar Liladhar Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=77608e81372f4a37ec0a94ba79f4872babc3f87fcefa96c1e8d62e11df9527f6, cn=Shyamsundar Liladhar Patil
Date: 2019.06.26 15:52:34 +05'30'

(श्यामसुंदर पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राज भवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
६. प्रधान महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
८. अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. सर्व नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, नोंदणी व मुद्रांक विभाग,
१३. सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-१ (उ.श्रे.)/(नि.श्रे.),
१३. कक्ष अधिकारी,सेवा-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
१४. कक्ष अधिकारी, राकावि-२, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई - ४०० ०३२
१५. निवडनस्ती (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.